**भूसंपादन अधिनियम १८९४ अन्वये मा. दिवाणी न्यायालयाच्या आदेशानुसार वाढीव मोबदला वाटपाच्या कार्यवाहीमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी मार्गदर्शक सूचना व त्यानुसार कालबध्द कार्यक्रमाची आखणी.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१७/PIL-३४/प्र.क्र.१०४/भाग-१/अ-४.**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक २८ फेब्रुवारी, २०१८

**प्रस्तावना :-**

मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिका क्र.३४/२०१७ मध्ये मा. न्यायालयाने दि.११ सप्टेंबर,२०१७ रोजी दिलेल्या आदेशामध्ये कलम १८ खालील भूसंदर्भ प्रकरणामध्ये मा. दिवाणी न्यायालयाने दिलेल्या वाढीव मोबदल्याच्या प्रकरणांमध्ये संबंधित संपादक संस्थेने तातडीने वाढीव मोबदल्याची रक्कम उपलब्ध करून न दिल्यामुळे मोबदला वाटपाची कार्यवाही त्वरेने करण्यात येत नाही.

मोबदला वाटपाची कार्यवाही त्वरेने न केल्याने शासनास १५ % व्याजाचा भूर्दंड सोसावा लागत असून शासनाच्या तिजोरीवर बोजा पडत आहे.

काही विभागांमध्ये सार्वजनिक प्रकल्पांसाठी (उदा रस्ते, रोजगार हमी योजने खालील प्रकल्प) भूसंपादन अधिनियमांतर्गत कार्यवाही न करता परस्पर जमीन / मालमत्ता आगाऊ स्वरूपात ताब्यात घेण्यात आली आहे व भूधारकांना / मालमत्ता धारकांना त्याचा मोबदला देण्यात आलेला नाही. असे ही निरीक्षण मा. न्यायालयाने नोंदविले आहे.

त्याकरिता सदर जनहित याचिकेच्या अनुषंगाने मा. न्यायालयाने नमुद केलेल्या बाबींचा सर्वंकष विचार करुन खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात येत आहेत.

**शासन परिपत्रक :-**

भूसंपादन अधिनियम १८९४ चे कलम १८ अन्वये मा. जिल्हा / दिवाणी न्यायालयाने दिलेल्या वाढीव मोबदल्याच्या आदेशाच्या अनुषंगाने मा.जिल्हा/ दिवाणी न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या प्रकरणांमध्ये संबंधीत संपादक संस्थेने वाढीव मोबदल्याच्या निधीची तरतूद अर्थसंकल्पामध्ये करून तो निधी संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडे न्यायालयीन प्रकरणांमध्ये मोबदला वाटपासाठी उपलब्ध करून द्यावा. संपादक संस्थेने या प्रकरणांमध्ये निधी उपलब्ध करून देण्यास विलंब केल्यास त्यास संबंधित संपादक संस्थेस / मंत्रालयीन प्रशासकीय विभागास जबाबदार धरण्यात यावे.

या प्रकरणांमध्ये वाढीव मोबदल्याचा निधी उपलब्ध करून देण्याची जबाबदारी ही संबंधित संपादक संस्थेची असल्यामुळे, संपादक संस्थेने जबाबदारीने व दक्षतेने कार्यवाही करावी.

मा. न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार राज्यातील भूसंपादन संस्था निहाय, वर्ष निहाय प्रकरणांचा व देय रक्कमांचा तपशिल विभागीय आयुक्तांकडून प्राप्त करून घेण्यात आलेला होता. या रक्कमांचा तपशिल पाहता कोटयावधी रूपये संबंधित भूधारकांना देय असून वर्षानुवर्ष भूधारकांना मोबदला न मिळाल्यामूळे त्यांच्या मनात असंतोष निर्माण होत आहे.

विभागीय कार्यालयांकडून शासनास प्राप्त प्रलंबित रक्कमांच्या तपशीलाचा अभ्यास करून त्यानुसार गुणवत्तेने निधी वाटपाचा कालबध्द कार्यक्रम भूसंपादन संस्था, भूसंपादन अधिकारी व जिल्हाधिकारी यांनी आखावा. या कालबध्द कार्यक्रमाचा तपशिल त्वरेने शासनास उपलब्ध करून द्यावा, जेणे करून निधी उपलब्धते बाबत भूसंपादन संस्थांच्या मंत्रालयीन प्रशासकीय विभागाकडे निधी उपलब्ध करून देणे याबाबत पाठपूरावा करता येईल.

या बाबत संबंधितांनी काटेकोरपणे दक्षता घ्यावी अन्यथा असे काही आढळून आल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम,२००५ नुसार त्यांच्याविरुध्द कार्यवाही करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

तरी सर्व जिल्हाधिकारी यांनी सदर परिपत्रक त्यांच्या अधिनस्त भूसंपादन अधिका-यांच्या निदर्शनास आणण्याची कार्यवाही विनाविलंब करण्यात यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१८०२२८१७२८१६७०१९ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Subhash K Gawade

Digitally signed by Subhash K Gawade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=40b8b2876e2135f5b158b877f59754b2a7ddf64e0cf59f2dc33ad60b8bce5bcd, cn=Subhash K Gawade
Date: 2018.02.28 17:30:27 +05'30'

**( सु. कि. गावडे )**
सहसचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१) मा.मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई
२) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा.मंत्री (वित्त व वने) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा.मंत्री (जलसंपदा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) सर्व मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६) मा.मुख्य सचिव यांचे सह सचिव, मंत्रालय, मुंबई
७) सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव /सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
८) सचिव (वने) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
९) सर्व विभागीय आयुक्त
१०) सर्व जिल्हाधिकारी
११) सर्व जिल्हा सरकारी वकील
१२) निवडनस्ती (अ-४
१३) कार्यासन अ-१, अ-२,अ-३,अ-४